# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जून –२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | नवघर पोलीस ठाणे मुंबई | गु.र.क्र. २६/१९ कलम ३०२, २०१ भा.द.वि |

**–:खून करुन गुन्हयाचा पुरावा नाहीसा करणे:–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– दिनांक २८/०१/२०१९ रोजी केळकर कॉलेजच्या मागील बाजुस स्मशानभुमी बी.एम.सी वसाहतीचे भिंतीलगत असलेल्या ओसाड जागेत एका अनोळखी इसमाचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून डोक्यात, वर व मागील बाजुस कोणत्यातरी टणक व बोथट हत्याराने प्रहार करून त्यास जिवेठार मारून मृताची ओळख लपविणेकरीता व गुन्हयातील पुरावा नष्ट करणेकरीता त्याचा चेहरा जाळून विद्रुप केला म्हणून गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | श्री विजय राजाराम महाडीक वय ५६ वर्ष, धंदा–नोकरी, |
| **बळीत/मयत** | :– | विजयकिशोर रामहरक यादव, वय ३० वर्षे |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | योगेश एकनाथ राणे, वय ३३ वर्षे.<br>२०/०६/२०१९ |

- **तपास कौशल्य** :– सदर गुन्हयातील मयत इसमाचे मृतदेहाचे के.ई.एम रूग्णालय, मुंबई येथे शवविच्छेदन झालेनंतर डॉक्टरांचे अभिप्राय व इतर पुराव्याचे आधारे सदर इसमाचा मृत्यु हा दि. २५/०१/१९ ते दि २६/०१/१९ चे दरम्यान झाला असावा व मृतकाचे वय २५ ते ३३ वर्षे असावे असे निश्चित करण्यात आले. घटनास्थळावर मृतदेहाची ओळख पटेल अशा प्रकारचा कुठलाही पुरावा किंवा अंगावर कुठल्याही प्रकारची निशाणी नसल्याकारणाने मृतदेहाची ओळख पटविणे जिकीरीचे होते. म्हणून मा. पोलीस उप आयुक्त, अखिलेशकुमार सिंग यांनी परिमंडळ–७ मधील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार बोलवून विविध तपास पथके तयार केली. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, ठाणे ग्रामीण, नाशिक व उर्वरीत महाराष्ट्र राज्य व इतर राज्यांमध्ये दाखल असलेल्या हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेतला त्यातुन काही संशयास्पद हरविलेल्या व्यक्तींचे नातेवाईकांना प्रत्यक्ष फोटो दाखवून ओळख पटविण्याचा प्रयत्न केला व काही नातेवाईकांचा डी.एन.ए चाचणी करण्यात आली परंतु त्यात यश प्राप्त झाले नाही.
- तपासामध्ये सर्व तांत्रिक बाबींचे विश्लेषण करण्यात आले. मृतदेहाचे कवटीवरून तमबवदेजतनबजपवद वि बिम तयार करून सदर फोटो सर्व राज्यभरात प्रसिध्द करण्यात आले. लोकसभा निवडणुक आल्यानंतर देखील नवघर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून सदर गुन्हयांचे तपासात सातत्य व चिकाटी ठेवली गेली.

- दिनांक २९/०४/२०१९ रोजी योगेश राणे या इसमाने त्याचेसोबत काम करणारा नवराज रेग्मी यास किरकोळ कारणावरून डोक्यात हातोडयाने प्रहार करून जखमी केले त्यासंदर्भात नवघर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र ९२/१९ कलम ३०७,५०४,५०६ भा.दं.वि अन्वये गुन्हा दाखल करून योगेश राणे यास अटक केली व सदर गुन्हयात तो जेल कस्टडी झाला.

- सदर तपासादरम्यान यातील गुन्हयाचा सुक्ष्म अभ्यास केल्यानंतर तपासी अधिकारी यांना संशय

आल्याने सदर गुन्हयातील आरोपी काम करीत असलेल्या विश्वभारती हॉटेलमध्ये गुप्त चौकशी करून सदर हॉटेल मधून हॉटेल सोडून गेलेले कोण इसम आहेत त्याची माहिती काढली असता. दिनांक २६/०१/१९ रोजी पासुन विजयकिशोर यादव नावाचा मोरीत काम करणारा हॉटेलमध्ये येत नसल्याचे आढळले म्हणून त्याचा फोटो व गावचा पत्ता प्राप्त करून त्याचा भाऊ रामकिशोर यादव यास उत्तरप्रदेश येथे संपर्क साधुन मुंबईत बोलावले. त्यास मृतकाचा फोटो दाखविला असता त्याने तो फोटो त्याचा भाऊ विजयकिशोर यादव याचा असल्याचे ओळखले. म्हणून त्याची क्छ। चाचणी केली असता ती त्याच्या मयत भावाशी मॅच झाल्यावरून सदरचा मयत हा विजयकिशोर यादव हाच असल्याचे निष्पन्न झाले.

- गुन्हयातील साक्षीदार व इतर पुराव्यावरून योगेश एकनाथ राणे, वय ३३ वर्षे यास अटक करण्यात आलेली असून त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला एक लोखंडी हातोडा हस्तगत करण्यात आला आहे.

- सदर गुन्हयातील मयताची ओळख पटविणारा एकही पुरावा उपलब्ध नसताना ५ महिने तपासात सातत्य ठेवून कौशल्यपुर्वक तपास करून मयताची ओळख पटवून नमुद गुन्हयातील आरोपीतास अटक करण्यात पोलीसांना यश आलेले आहे.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे जून—२०१९ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **नवघर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | व.पो.नि. | पुष्कराज गोविंदराव सुर्यवंशी |
| २ | पो.नि. | प्रताप गंगाराम भोसले |
| ३ | पो.नि. | विकास धोंडीराम भुजबळ |
| ४ | स.पो.नि. | भारत एकनाथ जाधव |
| ५ | स.पो.नि. | संदिप गोविंद माने |
| ६ | स.पो.नि. | दिपाली भुषण कुलकर्णी |
| ७ | पो.उ.नि | महेश बाबुराव लामखडे |
| ८ | म.पो.उ.नि. | किरण गुलाबराव पाटील |
| ९ | स.पो.फौ.क्र. २३३८६ | संजय महादेव घाटगे, |

| | | |
|---|---|---|
| १० | पो.ह.क्र ११९३५ | रविंद्र पोपट ठाकुर |
| ११ | पो.ह.क्र २७४६८ | विजय धोंडु महागांवकर |
| १२ | पो.ना.क्र.९८००१९ | राजेंद्र जीभाऊ खैरणार |
| १३ | पो.ना.क्र ९७११९३ | भरत गोपिनाथ सुर्यवंशी |
| १४ | पो.शि.क्र ०३५५१ | अण्णासाहेब दौलत पिलाणे |
| १५ | पो.शि.क्र ०९००३३७ | विजयकुमार राम नुकलवार |
| १६ | पो.शि.क्र १११०२१ | विनायक विश्वास आंब्रे |
| १७ | पो.शि.क्र ११०७४९ | कृष्णकुमार बाबुराव पांडव |
| १८ | पो.शि.क्र ०८०९३१ | नितेश राजाराम घोडे |
| १९ | पो.शि.क्र ०६०६९६ | विनोद दत्तात्रय जगदाळे |

✡✡✡✡✡✡✡